**सं.फौ.ख.क्र. १२७/२०२४**

**सरकार –वि– गणेश जाधव**

**निशाणी क्र. १२**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ ची शपथेवर जबानी.**

नांव – हनुमान शिवाजी बोरसे

वय – ३५

धंदा – शेती

राहणार – भोयेगाव ता. चांदवड जि. नाशिक

**सर–तपासणी सरकारतर्फे श्री. आर. एम. वाळके सहा. सरकारी अभियोक्ता**

१. दि.२७.०९.२०२३ रोजी संध्याकाळी ८:३० ते ९:०० च्या दरम्यान माझे वडील किर्तनाच्या कार्यक्रमासाठी जोपूळ येथे त्यांच्या मोटारसायकल क्र. एम.एच.१५, एफ.ए.१६८७ ने गेले होते. किर्तनाचा कार्यक्रम आटोपून माझे वडील त्यांचे मित्र जगन्नाथ गणपत जाधव यांना सोडण्यासाठी भोयेगावला चालले होते. तेव्हा चांदवड कडून भरधाव वेगाने येणारी मोटारसायकल क्र. एम.एच.१५ एच.डब्लू.३५४३ ने माझ्या वडीलांच्या मोटारसायकलला ठोस मारली. त्यामुळे माझे वडील रस्त्यावर खाली पडले. मला त्याचदिवशी रात्री १२:०० ते १:०० च्या दरम्यान आमच्या गावातील चंद्रभान ठोंबरेने फोन करुन माझ्या वडीलांचा चांदवड–भोयेगाव रस्त्यावर अपघात होऊन ते रस्त्यावर पडल्याचे मला सांगितले.

२. मी घटनास्थळी येऊन पाहिले असता माझे वडील तिथे पडले होते. त्यांच्या डोक्याला पुढे व पाठीमागे मार लागला होता. घटनास्थळी आरोपी देखील होता. माझ्या वडीलांच्या सोबत असलेल्या जगन्नाथ जाधव यांना देखील हाताला, डोक्याला व पायाला मार लागला होता. घटनास्थळी मी माझ्या आते भावाला मच्छींद्र ठोंबरेला फोन करुन बोलावून घेतले. तो आल्यानंतर माझ्या वडीलांना व आरोपीला अॅम्बूलंस मध्ये घालून

सरकारी दवाखाना चांदवड येथे आणले.

३. डॉक्टरांनी माझ्या वडीलांना तपासल्यानंतर मयत म्हणून घोषीत केले. त्यानंतर वडीलांना घरी आणून त्यांचे अंत्यविधी केले व दि.०६.१०.२०२३ रोजी आरोपीविरुद्ध वडाळी भोई पोलीस चौकीला फिर्याद दिली. मला आता दाखवलेली फिर्याद तिच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. फिर्यादला **निशाणी १३** देण्यात येते. मला आता दाखवलेली छापील प्रथमखबर तिच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. फिर्यादला **निशाणी १४** देण्यात येते. मी आरोपीला ओळखतो. तो आज न्यायालयात हजर आहे. सदरचा अपघात आरोपीच्या चुकीमुळे झाला.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. आर. पी. ठाकरे यांच्यातर्फे सुरु**

४. भोयेगाव ते चांदवड अंतर १२ किमी आहे. हे म्हणणे खरे आहे की भोयेगाव गावामधून चांदवड ते निफाड जाणारा रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की सोग्रस पासून भोयेगावला जाणारा रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की भोयेगाव मधून जाणारा चांदवड ते निफाड हा रस्ता नेहमी वाहतुकीचा असतो. हे म्हणणे खरे आहे की त्या रस्त्यावरुन दर तासाला साधारणतः ५० ते १०० छोट्या–मोठ्या वाहनांची वर्दळ चालू असते.

५. हे म्हणणे खरे आहे की संध्याकाळच्या वेळी मोटारसायकल चालवत असतांना समोरुन एखादे मोठे वाहन आल्यास त्याच्या लाईटने चालकाचे डोळे दिपतात. माझ्या वडीलांचे वय ७० वर्ष होते. हे म्हणणे खरे आहे की सदरची घटना कशी घडली याविषयी मला वैयक्तिक माहिती नाही. घटनास्थळी आरोपी स्वतः हजर असल्यामुळे मला त्याचे नाव माहित आहे. आरोपी जोपूळ गावचा आहे. घटनेच्या आधी माझी आरोपीसोबत कोणतीही ओळख नव्हती.

६. घटनेवेळी माझे वडील किर्तनाला जोपूळला गेले होते. किर्तनाची वेळ संध्याकाळी ०९:०० ते ११:०० अशी होती. जोपूळ हे भोयेगावच्या पश्चिमेला २ किमी अंतरावर आहे. जोपूळ ते भोयेगाव साधरणतः १५ मिनीटात पोहोचता येते. हे म्हणणे खरे आहे की उज्वल इंग्लीश मिडीयम स्कूल हे निफाड ते चांदवड रस्त्यावर आहे. हे म्हणणे खरे आहे की जोपूळहून भोयेगावकडे येतांना उज्वल इंग्लीश मिडीयम स्कूल लागत नाही. हे म्हणणे खरे आहे की सदरचा अपघात मी स्वतः प्रत्यक्ष पाहिलेला नसल्यामुळे तो माझ्या वडीलांच्या चुकीमुळे झाला, आरोपीच्या चुकीमुळे झाला की इतर कोणाच्या चुकीमुळे झाला हे मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्या वडीलांचे वय जास्त असल्यामुळे ते स्वतःच मोटारसायकलवरुन घसरुन पडले व त्यांना मार लागला. हे म्हणणे खरे नाही की सदरचा अपघात माझ्या वडीलांच्या चुकीमुळे झालेला असतांनाही त्यांच्या मृत्यूचा गैरफायदा घेऊन मी आरोपीविरुद्ध खोटी फिर्याद दिलेली आहे.

७. घटना दि.२७.०९.२०२३ रोजीच आहे व मी फिर्यादी दि.०६.१०.२०२३ रोजी दिलेली आहे. ज्यादिवशी घटना घडली त्यादिवशीच माझे वडील वारले. सदर अपघाताबाबत घटनेदिवशीच मी पोलीसांना कळवले होते. मी घटनेदिवशीच फिर्याद दिली नाही. फिर्याद देण्याच्या अवस्थेत मी नसल्यामुळे घटनेनंतर मी लगेचच फिर्याद दिली नाही. मला तीन बहिणी आहेत. माझ्या वडीलांच्या अंत्यविधीसाठी घटनेच्या दुसऱ्या दिवशी माझ्या बहीणी व त्यांचे पती आले होते. माझ्या बहीणींनी फिर्याद दिली नाही. दि.१०.१०.२०२३ ला माझ्या वडीलांचा दशक्रिया विधी झाला व त्यानंतर आम्ही पो.स्टेशनला फिर्याद दिली.

८. फिर्याद देतांना पोलीसांना फिर्याद देण्यासाठी मला का उशिर झाला हे मी सांगितले नाही. हे म्हणणे खरे नाही की घटनेवेळी आरोपीने माझ्या

वडीलांच्या मोटारसायकलला जोरात ठोस मारल्यामुळे सदरचा अपघात झाल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की सदरचा अपघात आरोपीच्या चुकीमुळे झाल्याचे मी खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की माझे वडील स्वतःच मोटारसायकल स्लीप होऊन पडले व त्यांना मार लागला व त्यामध्ये त्यांचा मृत्यू झाला. हे म्हणणे खरे नाही की मी सदरचा अपघात आरोपीच्या चुकीमुळे झाल्याचे खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की सदरचा अपघात माझ्यासमक्ष झालेला नसतांनाही तो अपघात आरोपीच्या चुकीमुळे झाल्याचे मी खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2025.10.31 15:07:17 +0530

**दि. ३१.१०.२०२५**

**(वृषाली दी. सुंगारे)**
**सह दिवाणी न्यायदंडाधिकारी,**
**क.स्तर चांदवड.**

**सं.फौ.ख.क्र. १२७/२०२४**

**सरकार –वि– गणेश जाधव**

**निशाणी क्र. १५**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. २ ची शपथेवर जबानी.**

नांव – सोमनाथ मनोहर बोरसे

वय – २७

धंदा – शेती

राहणार – भोयेगाव ता. चांदवड जि. नाशिक

**सर–तपासणी सरकारतर्फे श्री. आर. एम. वाळके सहा. सरकारी अभियोक्ता**

१. दि.२८.०९.२०२३ रोजी मला पोलीसांनी भोयेगाव येथील इंग्लीश मिडीयम शाळेजवळ बोलाविले होते. घटनास्थळावर मोटारसायकल व रक्त पडले होते. पोलीसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा केला. त्यावर मी सही केली. मला आता घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. पंचनाम्याला **निशाणी १६** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. आर. पी. ठाकरे यांच्यातर्फे सुरु**

२. अपघातातील मयत शिवाजी बोरसे माझे आजोबा होते. फिर्यादी माझे चुलते आहेत. पंचनाम्यासाठी पोलीसांनी मला नोटीस दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळ पंचनामा पोलीसांनी तयार केला व त्यावर मी पोलीसांच्या सांगण्यावरुन मी केवळ सही केली. हे म्हणणे खरे नाही की घटनास्थळ पंचनाम्यामध्ये पोलीसांनी काय लिहिले याविषयी मला काहीही

माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर अपघातातील मयत माझे आजोबा असल्यामुळे पंचनाम्यामध्ये काय लिहिले आहे हे माहित नसतांना देखील त्यामधील मजकूर माहित असल्याचे मी खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

SUNGARE VRUSHALI DINANATH
Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2025.10.31 15:07:24 +0530

**दि. ३१.१०.२०२५**

**(वृषाली दी. सुंगारे)**
**सह दिवाणी न्यायदंडाधिकारी,**
**क.स्तर चांदवड.**